192

महाराष्ट्र शासन,
आदिवासी विकास विभाग

# स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना मूल्यमापन अहवाल

वर्ष - २००७-०८

आयुक्त
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

# अनुक्रमणिका


| प्रकरण. क्र. | विषय | पृष्ठ क्र. | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| | प्रस्तावना | ३ | - |
| | स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना | ४ | ५ |
| १) | मुल्यमापनाचे उद्देश | ६ | - |
| २) | कार्यपध्दती | ७ | - |
| ३) | पृथ्थ:करण | | |
| | १) क्षेत्रिय पाहणी | ८ | - |
| | २) जमातनिहाय वर्गीकरण | ९ | १० |
| | ३) जमातनिहाय वैशिष्ठये | ११ | १२ |
| | ४) महिला लाभार्थ्यांचा सहभाग | १३ | १४ |
| | ५) वयोगटानुसार लाभार्थी | १५ | - |
| | ६) साक्षरता | | |
| | अ) साक्षरतेचे प्रमाण | १६ | १७ |
| | ब) लिंगभेदानुसार साक्षरता | १८ | २० |
| | क) शैक्षणिक स्तर | २१ | २३ |
| | ७) आरोग्य | २४ | - |
| | ८) जमीनधारणा | २५ | २६ |
| | ९) व्यवसायानुसार वर्गीकरण | २७ | - |
| | १०) योजनेची निवड व स्थिती | | |
| | अ) योजनानिहाय लाभार्थीची संख्या | २८ | २९ |
| | ब) योजनेतून मिळालेल्या लाभाची स्थिती | ३० | - |
| | ११) पशुधन | ३१ | ३२ |
| | १२) कर्ज परतफेड | ३३ | ३४ |
| | १३) लाभधारकाचे उत्पन्न व आर्थिक स्थिती | ३५ | ४१ |
| ४) | योजना राबविण्यातील अडचणी / उपाययोजना | ४२ | - |
| ५) | सारांश | ४३ | - |
| ६) | निष्कर्ष | ४४ | - |
| ७) | लाभार्थी पत्रक | ४५ | ५० |

# प्रस्तावना

दारिद्रय निर्मुलनासाठी शासनामार्फत विविध वैयक्तिक लाभाच्या योजना वेगवेगळया विभागाकडून राबविण्यात येतात. केंद्र शासनाने दिनांक १-४-९९ पासून स्वर्णजयंती ग्रामस्वयंरोजगार योजना ही दारिद्रय निर्मुलनाची योजना सुरू केली आहे. दारिद्रय रेषेखालील कुटुंबांना बँकांचे कर्ज व शासकीय अनुदान देऊन स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून देणे व अशा लाभ दिलेल्या कुटुंबांना दारिद्रयरेषेच्यावर आणून अशा कुटुंबांची किमान रू.२०००/- मासिक प्राप्ती व्हावी हा स्वर्णजयंती रोजगार योजनेचा प्रमुख उद्देश आहे.

हया योजनेचा आदिवासी कुंटुबांना कितपत फायदा झाला हे पहाण्यासाठी सदर योजनेची मुल्यमापनासाठी निवड करण्यात आली.

सदर मुल्यमापन पहाणीचे क्षेत्रीय काम श्रीमती. ए. एस. काळे ( संशोधन अधिकारी ), श्री.पी. बी. कुदळे (संशोधन सहाय्यक ), श्री. एस.आर.तरकसबंद (संशोधन सहाय्यक ), श्री. यु.एम. यादव (आरेखक) व श्री.आर.एस.पवार (अनवेषक) यांनी पूर्ण केले असून अहवाल लिखाणाचे काम श्रीमती. ए. एस. काळे संशोधन अधिकारी यॉंनी श्री.एस.डी. बिराजदार (उपसंसचालक एक्षेविका ) यांचे मार्गदर्शनाखाली पुर्ण केलेले आहे.

सदर मुल्यमापन पहाणी अहवाल आदिवासींसाठी योजनांची आखणी व अंमलबजावणी करणा-या अधिका-याना उपयोगी पडेल अशी अपेक्षा आहे.

(डॉ.ए.के.झा)
आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे - १

दिनांक :-

ठिकाण :- पुणे

# स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना

केंद्र शासनाने दि.१/४/१९९९ पासून "स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार" योजना ही दारिद्रय नाची योजना सुरु केली आहे. सदर योजनेंतर्गत केंद्र व राज्य यांचा हिस्सा अनुक्रमे ७५:२५ आहे. दारिद्रय रेषेखालील कुटूंबाना बँकाचे कर्ज व शासकीय अनुदान देऊन स्वयंरोजगाराचे उपलब्ध करुन देणे व अशा लाभ देण्यात आलेल्या कुटूंबाना दारिद्रय रेषेच्यावर आणून अशा चे मासिक उत्पन्न किमान रु.२०००/- इतके वाढविणे हा स्वर्णजयंती रोजगार योजनेचा प्रमुख आहे.

**चची ठळक उद्दिष्टे :-**

स्थानिक स्तरावर दारिद्रय रेषेखालील ग्रामीण जनतेच्या क्षमतेचा वापर करुन लहान उद्योग र्मितीचे साधन निर्माण करुन पुरेसा रोजगार निर्माण करणे हे स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेचे वैशिष्ठय आहे.

स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार" योजना ही दारिद्रय रेषेखालील कुटूंबाच्या लहान उद्योजकांसाठीचा ार्यक्रम असून तो स्वयंरोजगारा संबंधीचे सर्व मुद्दे लक्षात घेऊन तयार करण्यात आलेला आहे. या ोजनेंतर्गत ग्रामीण लोकांमध्ये स्वयंसहाय्यता गटांची निर्मिती, कृतीचे नियोजन, मूलभूत सोईंचा वकास व तांत्रिक कौशल्य व विपणन व्यवस्था इत्यादी बाबींचा समावेश आहे.

"स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार" योजनेंतर्गत लहान उद्योजकांना प्रस्थापित करताना गट समूहाला प्राधान्य देण्यात आले आहे. ४-५ प्रमुख कार्यक्रम निवडताना गट स्तरावर पंचायत समितीची मान्यता तसेच जिल्हा स्तरावर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा/जिल्हा परिषद यांची मान्यता घेण्यात येते.

) स्वर्णजयंती योजनेमध्ये गट समूहाला प्राधान्य देण्याचे ठरले असून गट पातळीवरील स्वयं सहाय्यक गटांपैकी निम्मे गट खास करुन महिलांचे असावेत अशा मार्गदर्शक सुचना आहेत.

या योजनेंतर्गत अनुसूचित जमातींसाठी (आदिवासीसाठी) प्रकल्प किंमतीच्या ५०% व वैयक्तिक स्तरावर जास्तीत जास्त रु.१०,००० अनुदान देण्यात येते, स्वयंरोजगाराच्या गटसमूहासाठी, प्रकल्प किंमतीच्या ५०% व जास्तीत जास्त रु. १.२५ लाखा पर्यंत अनुदान देय आहे. सिंचन प्रकल्पासाठी सदर आर्थिक मर्यादा लागू करण्यात आलेली नाही.

६) या योजनेंतर्गत स्वयंरोजगाराच्या लाभार्थ्यांपैकी ५०% लाभार्थी अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीचे असावेत व त्यापैकी ४०% लाभार्थी महिला असाव्यात व ३% लाभार्थी विकलांगांपैकी असावेत असे निकष ठरविण्यात आले आहेत.

७) स्वर्णजयंती योजना जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेमार्फत राबविण्यात येते.

८) राज्यात सन १९९८-२००५ या कालावधीत स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेंतर्गत अनुसूचित जमातीच्या ८२०५१ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला त्यांना रु.७६४४.६५/- लक्ष अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे.

---**---

# प्रकरण - १

## मुल्यमापनाचे उद्देश

आदिवासी जमातीच्या दारिद्रय रेषेखालील कुटूंबाना "स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार" योजनेंतर्गत रोजगार उपलब्ध होऊन लाभार्थी कुटूंबाचे मासिक उत्पन्न रु.२०००/- पर्यत वाढले का, सदर कुटूंबे दारिद्रय रेषेच्यावर आली का, तसेच बचत गटांमार्फत कर्ज वाटप झाले का, कर्जफेड नियमित केली जात आहे का, तसेच कर्ज मिळवताना लाभार्थ्यांना काही अडचणी येतात का, हे पडताळण्यासाठी स्वर्णजयंती ग्राम स्वंयरोजगार या योजनेची मुल्यमापन पहाणी करण्यात आली. मुल्यमापनाची प्रमुख उद्दीष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१) अनुसूचित जमातीची "स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार" योजनेचा लाभ मिळालेली दारिद्रय रेषेखालील कुटूंबे दारिद्रय रेषेच्यावर आली का, हे पडताळणे.

३) योजना राबविताना लाभार्थ्यांना व कार्यान्वीत यंत्रणेला आलेल्या अडचणींचा अभ्यास करणे.

४) योजनेची अंमलबजावणी होताना शासनाच्या निकषांचे पालन करण्यात आले का हे पहाणे.

---**---

# प्रकरण -२

## कार्यपध्दती

"स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार" योजनेंतर्गत दारिद्रय रेषेखालील आदिवासी लाभार्थ्यांना दारिद्रय रेषेवर आणणे या योजनेच्या मुल्यमापनासाठी एक प्रश्नावली तयार करण्यात आली. या प्रश्नावलीमध्ये कुटुंबाची वैयक्तिक माहिती, कुटुंबाचा मुख्य व दुय्यम व्यवसाय कुटूंबांनी धारण केलेले जमिनीचे क्षेत्र, पशुधन, कुटुंबाचे योजनेपुर्वीचे व नंतरचे उत्पन्न, कुटूंबातील व्यक्तींचे वय, शिक्षण, इत्यादी माहितीचा समावेश होता.

"स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार" ही दारिद्रय निर्मुलनाची योजना महाराष्ट्रातील ग्रामीण भागात राबविण्यात येते. आदिवासींच्या दारिद्रय निर्मुलनाची पहाणी करण्यासाठी आदिवासी क्षेत्रातील धुळे व नंदूरबार या दोन जिल्हयांच्या ८ तालुक्यांमधील लाभार्थ्यांचे मुल्यमापन करण्याचे निश्चित करण्यात आले. पाहणीसाठी एक संशोधन अधिकारी , दोन संशोधन सहाय्यक , एक अन्वेषक , व एक आरेखक यांचा समावेश असलेल्या पथकाव्दारे दोन जिल्हयातील लाभधारकांची माहिती गोळा करण्यात आली.

पथकातील व्यक्तीची माहिती खालीलप्रमाणे आहे.

### पथक

| अ.क्र. | अधिकारी /कर्मचाऱ्याचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्रीमती. ए. एस. काळे | संशोधन अधिकारी |
| २ | श्री. एसः आर. तरकसबंद | संशोधन सहाय्यक |
| ३ | श्री.पी.बी. कुदळे | संशोधन सहाय्यक |
| ४ | श्री.यु.एम.यादव | आरेखक |
| ५ | श्री.आर. एस. पवार | अन्वेषक |

"स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार " योजनेंतर्गत विविध बाबींसाठी कर्ज व अनुदान दिलेल्या लाभधारकांची जिल्हा/तालुकानिहाय यादी जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, धुळे व नंदूरबार कार्यालयाकडून घेण्यात आली. यादीतील विविध बाबीसाठी लाभधारकास मिळालेल्या लाभाची लाभधारकास प्रत्यक्षात भेटून पहाणी करण्यात आली.

---**---

# प्रकरण -३

## पृथः करण

### १) क्षेत्रीय पाहणी

या कार्यालयाकडून मुल्यमापन पहाणी करण्यात आलेल्या लाभधारकांची जिल्हा/ तालुका / गावनिहाय माहीती खालील प्रमाणे आहे.

तक्ता क्र. ३.१

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | गावाचे नांव | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | धुळे | १) साक्री | १) सामोडा (घोडयाचा माळ) | १३ |
| | | | २) सुकापूर (केवडी पाडा) | |
| | | २) शिरपूर | १) सांगवी (जुनी) | २८ |
| | | | २) चिंचपाणी (बुडकी) | |
| २ | नंदूरबार | १) तळोदा | १) पिंपरी | १८ |
| | | | २) सोमावल (बु.) | |
| | | २) शहादा | १) पिंप्री | २१ |
| | | | २) इस्लामपूर | |
| | | ३) अक्कलकुवा | १) गलोठा (बु.) | २७ |
| | | | २) गलोठा (खु.) | |
| | | | ३) पोहरा | |
| | | ४) नंदूरबार | १) पाचोराबारी (नवी दिल्ली) | १४ |
| | | | २) ढेकवत | |
| | | ५) नवापूर | १) अँन्टी पाडा | २० |
| | | | २) वडदा | |
| | | ६)अक्राणी | १) सुरवाणी (मोठी) | २४ |
| | | | २) सुरवाणी (लहान) | |
| | | | ३) मुदलवाड | |
| | | | एकूण | १६५ |

---**---

## २ ) जमात निहाय वर्गीकरण


नंदूरबार व धुळे जिल्हयातील ८ तालुक्यातील एकुण १६५ लाभार्थ्यांची पहाणी करण्यात आली. त्यांची जमातीनुसार वर्गवारी पुढीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ३.२**

| अ. क्र. | अनुसूचित जमातीचे नाव | जिल्हयाचे नाव | तालुक्याचे नाव | गावांची संख्या | लाभार्थी संख्या | | % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | तालुका -वार | जमातीची एकूण | |
| १ | पावरा | नंदूरबार | १) शहादा | १ | ५ | १३ | ८ |
| | | धुळे | १) शिरपूर | २ | ८ | | |
| २ | धनका | नंदूरबार | १)अक्कलकुवा | २ | ६ | ६ | ४ |
| ३ | कोकणी | नंदूरबार | १) नवापूर | २ | १ | २६ | १६ |
| | | धुळे | २) शिरपूर | २ | १९ | | |
| | | | ३) साक्री | २ | ६ | | |
| ४ | भिल्ल | नंदूरबार | १) शहादा | २ | १६ | १०३ | ६५ |
| | | | २) अक्राणी | ३ | २४ | | |
| | | | ३) तळोदा | २ | १८ | | |
| | | | ४)अक्कलकुवा | ३ | २१ | | |
| | | | ५) नवापूर | २ | १५ | | |
| | | | ६) नंदूरबार | २ | ९ | | |
| | | धुळे | १) शिरपूर | २ | १ | ५ | २ |
| | | | २) साक्री | २ | ४ | | |
| ५ | मावची | नंदूरबार | १) नंदूरबार | २ | १ | ४ | १ |
| | | धुळे | १) साक्री | २ | ३ | | |
| ६ | ठाकर | नंदूरबार | १) नंदूरबार | २ | १ | १ | १ |
| ७ | गावीत | नंदूरबार | १) नवापूर | २ | ४ | ७ | ४ |
| | | | २) नंदूरबार | २ | ३ | | |
| एकूण - | | | | | १६५ | | १०० |

नंदूरबार व धुळे जिल्हयात मुख्यत: भिल्ल जमातीचे वास्तव्य असुन इतर जमातीची वस्ती तुरळक आहे .

# जमातनिहाय वर्गीकरण



## २) जमात निहाय वैशिष्ठये

**पावरा :-**

नंदूरबार जिल्हयातील १२४ कुटूंबातील ५ कुटुंबे पावरा जमातीची असून सर्वच्या सर्व पावरा जमातीच्या महीला लाभार्थी निरक्षर आहेत ५ पैकी ४ म्हणजे ८०% कुटुंबाकडे अत्यल्प जमिन आहे. सर्व कुटूंबांनी शेळीवाटप योजनेचा लाभ घेतला असून त्यांचा मुख्य व्यवसाय शेतमजुरी आहे व त्यांचेकडे पशूधनही नाही.

धुळे जिल्हयात पावरा जमातीचे ८ लाभार्थी आहेत पैकी ५०% लाभार्थी साक्षर असून सर्वच लाभार्थी भूमीहीन आहेत.

**कोकणी :-** नंदूरबार जिल्हयात कोकणी लाभार्थी नाहीत . मात्र धुळे जिल्हयातील ४१ लाभार्थ्यांपैकी २५ लाभार्थी कोकणी आहेत. हे प्रमाण जवळपास ६०% आहे. २५ पैकी १४ लाभार्थी साक्षर आहेत. व १० म्हणजे ४०% लाभार्थी भूधारक आहेत., कोकणी जमातीचे साक्षरतेचे व भूधारणेचे प्रमाण अनुक्रमे ५६% ते ४०% च्या आसपास आहे.

**धनका :-**

नंदूरबार जिल्हयातील १२४ लाभार्थ्यांपैकी धनका जमातीचे ५ लाभार्थी असून हे सर्व लाभार्थी भुमीहीन व निरक्षर आहेत. सर्वांनी महिष पालन योजनेचा लाभ घेतला आहे. व ३ लाभार्थ्यांचा मुख्य व्यवसाय मजुरी असून एक लाभार्थी शेतमजुरी करत असून एक इतर व्यवसाय करत आहे.

धुळे जिल्हयातून धनका जमातीचे लाभार्थी निवडलेले नाहीत.

**मावची :-**

नंदूरबार जिल्हयात मावची जमातीचा एक लाभार्थी असून तो निरक्षर आहे. शेतमजुरी हाच त्याचा मुख्य व्यवसाय आहे. सदर मावची लाभार्थी भुमिहीन आहे.

धुळे जिल्हयातील शिरपूर तालुक्यातील २८ लाभार्थ्यांत मावची जमातीचा एकही लाभार्थी नाही. तर साक्री मध्ये १३ लाभार्थ्यांत ३ मावची आहेत व ते सर्व निरक्षर व भूमिहीन आहेत.

गावित :-

नंदूरबार जिल्हयात गावित जमातीचे ६ लाभार्थी असून पैकी ५ लाभार्थी निरक्षर आहेत.

धुळे जिल्हयातील लाभार्थ्यांत गावित जमातीचे लाभार्थी निवडलेले नाहीत.

भिल्ल :-

धुळे जिल्हयापेक्षा नंदूरबार जिल्हयात भिल्ल जमातीचे वास्तव्य अधिक आहे व नंदूरबार जिल्हयातील एकूण १२४ लाभार्थ्यांपैकी १०४ लाभार्थी [८४ %] भिल्ल आहेत पैकी फक्त ३१ लाभार्थी साक्षर असून ४ लाभार्थी पदवीधारक आहेत. तर ३५[३३ %] लाभार्थी भूधारक आहेत . भूधारणेचे व साक्षरतेचे प्रमाण साधारणपणे ३३% म्हणजेच १/३ आहे. १५% भिल्ल लाभार्थी शेती व्यतिरिक्त इतर व्यवसायात गुंतलेले असून ८५% भिल्ल लाभार्थी शेती व शेती संबधी मजूरी मध्ये गुंतले आहेत.

जमात निहाय वैशिष्ठयांचा अभ्यास केला तर कोकणी समाजातील साक्षरतेचे व भूधारणेचे प्रमाण सर्वात जास्त असून त्या खालोखाल भिल्ल जमातीचा नंबर लागतो असे आढळते.

---**---

## ४) महीला लाभार्थ्यांचा सहभाग


मुल्यमापन केलेल्या १६५ लाभार्थ्यांपैकी महीला गट सदस्य व पुरुष गट सदस्य व वैयक्तिक लाभधारक यांची जिल्हा/तालुकानिहाय माहीती खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ३.३**

| अ. क्र. | जिल्हयाचे / तालुक्याचे नाव | एकुण लाभार्थी | महिला गट लाभार्थी | पुरुष गट लाभार्थी | वैय-क्तिक | महिला गट लाभार्थ्या-ची एकूण लाभार्थ्या-शी % | पुरुष गटातील सदस्याची एकूण लाभार्थ्या-शी % | वैयक्तिक लाभार्थ्या-ची एकूण लाभार्थ्या-शी % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शिरपूर | २८ | २२ | ६ | ० | ७९ | २१ | ० |
| २ | साक्री | १३ | ६ | ७ | ० | ४६ | ५४ | ० |
| **एकुण धुळे जिल्हा** | | **४१** | **२८** | **१३** | **०** | ६८ | ३२ | ० |
| १ | अक्राणी | २४ | २४ | ० | ० | १०० | ० | ० |
| २ | शहादा | २१ | २१ | ० | ० | १०० | ० | ० |
| ३ | तळोदा | १८ | १७ | ० | १ | ९४ | ० | ५ |
| ४ | अक्कलकुवा | २७ | २७ | ० | ० | १०० | ० | ० |
| ५ | नवापूर | २० | १९ | ० | १ | ९५ | ० | ५ |
| ६ | नंदूरबार | १४ | १४ | ० | ० | १०० | ० | ० |
| **एकुण नंदूरबार जिल्हा** | | **१२४** | **१२२** | **०** | २ | **९८** | **०** | २ |
| **एकूण धुळे व नंदूरबार जिल्हा** | | **१६५** | **१५०** | **१३** | २ | **९१** | **८** | १ |

"स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार" योजनेचा लाभ देतांना केंद्रशासनाच्या निकषानुसार ५०% लाभार्थी महीला असाव्यात अशा मार्गदर्शक सूचना आहेत., त्याप्रमाणे मुल्यमापन केलेल्या १६५ लाभार्थ्यांपैकी १५० ( म्हणजे ९१% ) लाभार्थी महीला असल्याने लाभार्थ्यांची निवड निकषानुसार झाली आहे असे आढळले.

## महिला लाभार्थी सहभाग



## ५) वयोगटानुसार लाभार्थी

धुळे व नंदूरबार जिल्हयात स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेचा लाभ घेतलेले लाभार्थी साधारणपणे खालील वयोगटातील असल्याचे आढळते.

**तक्ता क्र.३.४**

| अ.क्र. | तालुक्याचे नांव | लाभार्थी संख्या | लाभार्थ्यांचा वयोगट |
|---|---|---|---|
| **जिल्हा - धुळे** | | | |
| १) | शिरपूर | २८ | १९ ते ५० |
| २) | साक्री | १३ | २३ ते ६५ |
| **एकुण** | | **४१** | **१९ ते ६५** |
| **जिल्हा - नंदुरबार** | | | |
| १) | अक्राणी | २४ | २० ते ६५ |
| २) | शहादा | २१ | २१ ते ४५ |
| ३) | तळोदा | १८ | ३ ते ५५ |
| ४) | अक्कलकुवा | २७ | २१ ते ५५ |
| ५) | नवापूर | २० | २५ ते ५० |
| ६) | नंदूरबार | १४ | २५ ते ४५ |
| **एकुण** | | **१२४** | **३ ते ६५** |

धुळे व नंदूरबार जिल्हयातील एकूण १६५ लाभार्थ्यांच्या पहाणीतून असे आढळले की रोजगार मिळणे ज्यांचा हक्क आहे, व त्यासाठी जे सक्षम आहेत अशा १८ वर्षावरील व ६० वर्षाचे आतील १६२ लाभार्थ्यांना हया योजनेचा लाभ देण्यात आला आहे. फक्त ६५ वर्षाचा एक लाभार्थी नंदूरबार जिल्हयातील अक्राणी तालुक्यात असून, नंदूरबार जिल्हयातील तळोदा तालुक्यात एका लाभार्थ्यांचे वय केवळ ३ वर्षे असल्याचे आढळले आहे. ही ३ वर्षाची बालीका कुपोषित असल्याने सदर कुटुंब दारिद्रय रेषेच्यावर येण्यासाठी तिच्या नावाने तिच्या पालकांना हया योजनेतंर्गत सहाय्य देण्यात आले आहे.

---**---

## ६) साक्षरता

### अ) साक्षरतेचे प्रमाण


धुळे व नंदूरबार जिल्हयातील पहाणी केलेल्या १६५ लाभार्थ्यांचे तालुकानिहाय साक्षरतेचे प्रमाण खालील प्रमाणे आढळले.

तक्ता क्र. ३.५

| अ. क्र. | तालुक्याचे नावं | लाभार्थी | साक्षर | निरक्षर | साक्षर लाभार्थी टक्केवारी | निरक्षर लाभार्थ्यांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| जिल्हा - धुळे | | | | | | |
| १) | शिरपूर | २८ | १९ | ९ | ६८ | ३२ |
| २) | साक्री | १३ | ५ | ८ | ३८ | ६२ |
| | एकूण | ४१ | २४ | १७ | ५९ | ४१ |
| जिल्हा - नंदूरबार | | | | | | |
| १) | अक्राणी | २४ | १० | १४ | ४२ | ५८ |
| २) | शहादा | २१ | १ | २० | ५ | ९५ |
| ३) | तळोदा | १८ | ८ | १० | ४४ | ५६ |
| ४) | अक्कलकुवा | २७ | ५ | २२ | १९ | ८१ |
| ५) | नवापूर | २० | ५ | १५ | २५ | ७५ |
| ६) | नंदूरबार | १४ | ४ | १० | २९ | ७१ |
| | एकुण | १२४ | ३३ | ९१ | २७ | ७३ |
| | एकुण धुळे व नंदूरबार जिल्हा | १६५ | ५७ | १०८ | ३५ | ६५ |

पहाणी केलेल्या एकूण १६५ लाभार्थ्यांमध्ये साक्षरतेचे प्रमाण ३५% आहे. एकूण १६५ लाभार्थ्यांपैकी ४२% लाभार्थी धुळे जिल्हयातील असून त्यांच्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण ५९% आहे. उरलेले ५८% लाभार्थी नंदूरबार जिल्हयातील असून त्यांच्यामध्ये फक्त २७% लाभार्थी साक्षर आहेत. धुळे व नंदूरबार जिल्हयातील ज्या ८ तालुक्यात पहाणी केली त्यापैकी सर्वात ज़ास्त म्हणजे ६८% साक्षरता धुळे जिल्हयात शिरपूर तालुक्यात आढळली असून नंदूरबार जिल्हयातील शहादा तालुक्यात केवळ ५% लाभार्थी साक्षर असल्याचे आढळले.

# सा क्ष र ता



ब) लिंग भेदानुसार साक्षरता :-

तक्ता क्र. ३.६

| अ. क्र. | तालुक्याचे नावं | एकुण लाभार्थी | एकुण महिला लाभार्थी | महिला लाभार्थ्यांची एकूण लाभार्थ्यांशी टक्केवारी | एकुण साक्षर लाभार्थी | एकुण साक्षर महिला लाभार्थी | साक्षर महिला लाभार्थ्यांची एकुण साक्षर लाभार्थींशी टक्केवारी | साक्षर महिलांची एकुण महिला लाभार्थ्यांशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | जिल्हा- धुळे | | | | |
| १) | शिरपूर | २८ | २३ | ७९ | १९ | १६ | ८४ | ७० |
| २) | साक्री | १३ | ६ | ४६ | ५ | ० | ० | ० |
| | एकूण | ४१ | २८ | ६८ | २४ | १६ | ६६ | ५७ |
| | | | | जिल्हा - नंदूरबार | | | | |
| १) | अक्राणी | २४ | २४ | १०० | १० | १० | १०० | ४२ |
| २) | शहादा | २१ | २१ | १०० | १ | १ | १०० | ५ |
| ३) | तळोदा | १८ | १८ | १०० | ८ | ८ | १०० | ४४ |
| ४) | अक्कलकुवा | २७ | २७ | १०० | ५ | ५ | १०० | १९ |
| ५) | नवापूर | २० | १९ | ९५ | ५ | ५ | १०० | २६ |
| ६) | नंदूरबार | १४ | १४ | १०० | ४ | ४ | १०० | २९ |
| एकूण नंदूरबार | | १२४ | १२३ | ९९ | ३३ | ३३ | १०० | २७ |
| एकूण धुळे व नंदूरबार | | १६५ | १५१ | ९२ | ५७ | ४९ | ८६ | ३२ |

धुळे व नंदूरबार या दोन जिल्हयात एकूण १६५ लाभार्थ्यांपैकी १५१ महिला लाभार्थी असून ३२% महिला लाभार्थी साक्षर आहेत.

एकूण १५१ महिला लाभार्थ्यांपैकी १९% महीला लाभार्थी धुळे जिल्हयात असून त्यापैकी ६६% महिला साक्षर आहेत.मात्र ८१% महीला लाभार्थी नंदुरबार जिल्हयात असले तरी त्यांचे साक्षरतेचे प्रमाण फक्त २७% आहे.


तालुका निहाय विचार केला तर धुळे जिल्हयातील साक्री तालुक्यात एकूण ६ महिला लाभार्थ्यांपैकी एंकही महिला साक्षर नाही. नंदूरबार जिल्हयातील शहादा तालुक्यात महिला लाभार्थीचे साक्षरतेचे प्रमाण नगण्य म्हणजे केवळ ५% आहे. या तालुक्यात २१ महिला लाभार्थ्यापैकी एकच

महीला लाभार्थी साक्षर आहे. तर अक्कलकुवा, नवापूर व नंदूरबार तालुक्यात हे प्रमाण २० ते ३०% च्या आसपास आहे.

हया पाहणीवरुन असा निष्कर्ष निघतो की एकूणच आदिवासींचे साक्षरतेचे प्रमाण धुळे व नंदूरबार जिल्हयातील ८ तालुक्यांपैकी शिरपूर, अक्राणी व तळोदा वगळता उर्वरित सर्व तालुक्यात ३० % पेक्षा कमी आहे. महीलांचे साक्षरतेचे प्रमाण तर त्याहीपेक्षा कमी असून तळोदा व शहादा तालुक्यात ते नगण्य आहे. एकूण साक्षरतेच्या प्रमाणात वाढ होणे हे अतिशय गरजेचे आहे.

---**---

# महिलांची साक्षरता



### ) शैक्षणिक स्तर

## तक्ता क्र ३.७

धुळे व नंदूरबार जिल्हातील पहाणीसाठी निवडलेल्या १६५ लाभार्थ्यांपैकी ५७ लाभार्थी साक्षर असून सदर तालुका निहाय साक्षर लाभार्थ्यांचा शैक्षणिक स्तर पुढीलप्रमाणे आढळला.

| अ. क्र. | तालुक्याचे नावं | एकुण साक्षर लाभार्थी | लिहीता वाचता येते | पैकी ७ वी पर्यंत | ८ वी ते १० वी | १० वी पास | १२ वी व पदवी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | जिल्हा - धुळे | | | |
| १) | शिरपूर | १९ | १ | ९ | ३ | ४ | २ |
| २) | साक्री | ५ | - | ३ | २ | - | - |
| | एकूण | २४ | १ | १२ | ५ | ४ | २ |
| | टक्केवारी | १०० | ४ | ५० | २१ | १७ | ८ |
| | | | | जिल्हा - नंदूरबार | | | |
| १) | अक्राणी | १० | - | ४ | - | ३ | ३ पदवी |
| २) | शहादा | १ | १ | - | - | - | - |
| ३) | तळोदा | ८ | - | २ | १ | २ | २+१ पदवी |
| ४) | अक्कलकुवा | ५ | - | २ | ३ | - | - |
| ५) | नवापूर | ५ | - | २ | १ | १ | १ |
| ६) | नंदूरबार | ४ | - | २ | १ | १ | - |
| | एकूण | ३३ | १ | १२ | ६ | ७ | ७ |
| | टक्केवारी | १०० | ३ | ३७ | १८ | २१ | २१ |
| | एकूण धुळे व नंदूरबार जिल्हा | ५७ | २ | २४ | ११ | ११ | ९ |
| | टक्केवारी | १०० | ४ | ४२ | १९ | १९ | १६ |


पहाणी केलेल्या ५७ साक्षर लाभार्थ्यांपैकी ४ लाभार्थी पदवी धारक असून ५ लाभार्थी १२ वी पास व ११ लाभार्थी १० वी पास आहेत. मात्र नंदूरबार जिल्हयातील शहादा तालुक्यातील एकमेव साक्षर असलेल्या लाभार्थ्याला फक्त लिहीता वाचता येत आहे तसेच शिरपूर तालुक्यातील १ साक्षर लाभार्थ्यांने शालेय शिक्षण घेतलेले नाही.

कुटूंबातील १८ वर्षापर्यंतच्या मुलांमधील साक्षरतेचा विचार करता ९० % मुले साक्षर असुन त्यात मुलगा किंवा मुलगी असा भेद केलेला आढळत नाही. या साक्षरतेच्या प्रमाणातील दोन पिढयांच्या

दरम्यान्यची ही प्रगती निवासी आश्रमशाळांमुळे झाल्याचे आढळते. दारिद्रय रेषेखालील हया कुटूंबाचे उत्पन्न अत्यल्प असूनही मुलांना बालवयात शिक्षण देण्याची गरज पालकांना जाणवू लागल्याचे हे चिन्ह आहे.

---**---

## शैक्षणिक स्तर



45
40
35
30
25
20
15
10
5
0
7
41
18
18
16
बिगर शाळा
७वी पर्यन्त
८वी ते १०वी
१०वी पास
१२ वी व पदवी

## ७) आरोग्य

दोन जिल्हयांच्या हया पहाणीमध्ये आरोग्याच्या गंभीर समस्या असल्याचे आढळले नाही, वस्तीपासुन ४ ते ५ कि.मी.च्या अंतरावर शासकिय आरोग्य सुविधा उपलब्ध आहे व आजारासाठी दवाखान्यात जाण्याचे प्रमाणात वाढ झाली आहे. जरी आदिवासी महिला प्रत्यक्ष प्रसूतीसाठी ईस्पीतळात जात नसल्या तरी सुदधा प्रसूतीपुर्व तपासणीसाठी दवाखान्यात जाण्याबाबत त्या जागरुक झाल्या आहेत. शासकीय दवाखान्यातून गरोदर महिलांना देण्यात येत असलेल्या आहाराची व औषधांची त्यांना माहिती झाली असून, बालकांच्या लसीकरणाचे महत्वही पटले आहे , असे जाणवते. प्रसूतीच्या विवक्षित वेळी दवाखान्यात पोचण्यात येणा-या अडचणींमुळे प्रसूती दवाखान्यात करण्या ऐवजी घरी करण्याकडे कल दिसून येतो. मात्र वैद्यकिय सुविधेची मदत घेण्याची त्यांना आवश्यकता वाटत नाही असे नव्हे तसेच कुटूंबकल्याण शस्त्रक्रियांचे प्रमाणही लक्षणिय आहे. बहुतांशी शस्त्रक्रीया २ ते ३ अपत्यांनंतर ३० ते ३५ वयाचे दरम्यान झालेल्या आहेत.

---**---

## ८) जमीन धारणा

"स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार" योजनेच्या लाभार्थ्यांचा जमिन धारणेच्या दृष्टया विचार केला असता खालील प्रमाणे परिस्थिती आढळते.

**तक्ता क्र. ३.८**

| अ. क्र. | जिल्हा/ तालुका | एकुण लाभार्थी | पैकी भुमिहिन | भुधारक | | एकुण भुधारक | भुधारक लाभार्थ्यांचे प्रमाण % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | जिरायत | बागायत | | |
| | **जि.धुळे** | | | | | | |
| १) | शिरपूर | २८ | २३ | ५ | ० | ५ | १८ |
| २) | साक्री | १३ | ८ | २ | २ | ५ | ३८ |
| | **एकूण** | **४१** | **३१** | **७** | **२** | **१०** | **२४** |
| | **जि. नंदूरबार** | | | | | | |
| १) | अक्राणी | २४ | १४ | ९ | १ | १० | ४१ |
| २) | शहादा | २१ | ११ | ९ | १ | १० | ४८ |
| ३) | तळोदा | १८ | ९ | ३ | ६ | ९ | ५० |
| ४) | अक्कलकुवा | २७ | २२ | ५ | ० | ५ | १९ |
| ५) | नवापूर | २० | ९ | ५ | ६ | ११ | ५५ |
| ६) | नंदूरबार | १४ | १२ | ० | २ | २ | १४ |
| | **एकूण** | **१२४** | **७७** | **३१** | **१६** | **४७** | **३८** |
| | **एकूण** | **१६५** | **१०८** | **३८** | **१८** | **५७** | **३५** |

वरील तक्त्यावरुन असे आढळते की नंदूरबार जिल्हयात नंदूरबार व अक्कलकुवा तालुका वगळता इतर ४ तालुक्यात साधारणपणे ५०% लाभार्थी भुधारक आहेत. मात्र नंदूरबार तालुक्यातील फक्त १४% लाभार्थी भुधारक असून धुळे जिल्हयातील लाभार्थ्यांचे जमिनधारणेचे प्रमाण २४ % आहे.

ओलीता खालील शेतीचा विचार केला असता एकूण ५७ भुधारक लाभार्थ्यांपैकी केवळ ३३% भुधारकांची जमीन बागायत असुन, जिरायत भुधारक ६७% आहेत. जिरायत भुधारकांची बरीचशी जमीन नापिक माळरान किंवा डोंगर उताराची आहे. हया वरकस जमिनीकडे कुटूंबाचे चरितार्थाचे साधन म्हणून पहाता येत नाही. व त्यामुळे शेती हा, हया भुधारकांचा दुय्यम व्यवसाय सुध्दा होऊ शकत नाही.

नंदूरबार जिल्हयात १२४ लाभार्थ्यांपैकी १५% लाभार्थी पावरा/धनका/ गावित/कोकणी/मावची इत्यादी जमातीचे असून उर्वरित ८५% लाभार्थी भिल्ल जमातीचे आहेत व त्यापैकी ५०% लाभार्थी

भुधारक आहेत. कोकणी व भिल्ल वगळता इतर जमातीच्या लाभार्थ्यांकडे मालकीची फारशी जमीन नाही. काही लाभार्थी जंगल खात्याची किंवा इतर कुणाच्या मालकीची जमिन खंडाने कसायला घेतात. अर्थातच अतिक्रमीत जमिन किंवा खंडाने कसायला मिळालेली जमीन ही कायमस्वरुपी उपलब्ध होत नाही.

---**---

## ९) व्यवसायानुसार वर्गीकरण

"स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार" योजनेच्या लाभार्थ्यांच्या केलेल्या पहाणीनुसार नंदूरबार व धुळे जिल्हयातील बव्हंशी लाभार्थ्यांचा शेतमजुरी व मजुरी हाच मुख्य व्यवसाय आहे. काही लाभार्थ्यांचा शेती हा व्यवसाय असून, क्वचितच लाभार्थी किराणा दुकान चालवितात.

पाहणी केलेल्या एकूण १६५ लाभार्थ्यांपैकी ५७ लाभार्थी भुधारक आहेत व त्यापैकी केवळ १९ च लाभार्थ्यांची जमीन ओलीताखाली आहे. हया परिस्थितीमुळे शेती हा हया लाभार्थ्यांचा मुख्य व्यवसाय होऊ शकत नाही. रोजंदारी सुदधा उपलब्ध होत नसल्याने व रोजगार हमी योजनेची कामे नसल्याने अधून मधून मिळणारी शेतमजुरी हेच चरितार्थाचे मुख्य साधन आहे.

शेतमजुरी अथवा मजूरी महिन्यातील साधारणपणे व जास्तित जास्त १२ ते १५ दिवसच उपलब्ध होते बाकी दिवस बसून वाया जातात.

"स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार" योजनेचा लाभ घेतांना जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी दुग्ध व्यवसाय या योजनेचा लाभ घेतला आहे. त्या खालोखाल शेळी पालन योजना असुन , या व्यतिरिक्त पशुखाद्य, केळी विक्री, भाजी विक्री, किराणा दुकान , खतविक्री, थ्रेशरगिरण, इत्यादी योजनांचाही लाभार्थ्यांनी लाभ घेतलेला आढळतो.

---**---

तक्ता क्र.३.९

| योजनेचे नाव | | | | | लाभार्थींची संख्या | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जिल्हा - धुळे | | | | | जिल्हा - नंदूरबार | | | | | | | | |
| अ. क्र. | योजना | शिरपूर | साक्री | एकूण धुळे | अक्राणी | शहादा | तळोदा | अक्कलकुवा | नवापूर | नंदूरबार | एकूण नंदूरबार | एकूण धुळे व नंदूरबार | योजना निहाय लाभार्थी ची % |
| १) | पशुखाद्य | ४ | ३ | ७ | - | - | - | - | - | - | - | ७ | ४ |
| २) | शेळीपालन | ४ | ० | ४ | ३ | ७ | - | - | - | - | १० | १४ | ८ |
| ३) | दुग्ध | २० | ० | २० | २१ | १४ | १४ | २७ | १९ | १४ | १०९ | १२९ | ७८ |
| ४) | केळी व भाजी विक्री | ० | ३ | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | २ |
| ६) | खत | ० | २ | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | १ |
| ७) | थ्रेशर गिरण | ० | ५ | ५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५ | ३ |
| ८) | किराणा दुकान | ० | ० | ० | ० | ० | ४ | ० | १ | ० | ५ | ५ | ३ |
| एकूण -१६५ | | २८ | १३ | ४१ | २४ | २१ | १८ | २७ | २० | १४ | १२४ | १६५ | १०० |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की १६५ पैकी १२९ लाभार्थ्यांनी दुग्धव्यवसायासाठी कर्ज घेतले असुन हे प्रमाण ७८% च्या जवळपास आहे. शेळीपालनासाठी १४ (८%) लाभार्थ्यांनी कर्ज घेतले आहे. पशुखाद्य, खतविक्री , थ्रेशर हे इतर व्यवसाय फायदेशिर ठरले असले तरी सरावाचे, माहितीचे नसल्याने प्रतिसाद कमी असल्याचे दिसून येते. पशुखाद्य विक्री व्यवसायासाठी ७ लाभार्थ्यांनी कर्ज घेतले असून खतविक्रीसाठी २ लाभार्थ्यांनी कर्ज घेतले आहे. थ्रेशर व्यवसाय ५ लाभार्थ्यांनी स्विकारला असून केळी व भाजी विक्रीसाठी ३ महिला लाभार्थ्यांनी अनुदान घेतले आहे. "स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार" योजनेमध्ये अनुदान मिळवून ५ लाभार्थ्यांनी किराणा दुकान सुरु केले आहे.

---**---

## ब) योजनेतून मिळालेल्या लाभाची स्थिती

पहाणीमधील लाभार्थ्यांची योजनेंतर्गत मिळालेली बहुतांश मालमत्ता सुस्थितीत असून किराणा दुकान , पशुखाद्य, खतविक्री, व थ्रेशर गिरण हे व्यवसाय व्यवस्थित चालु असल्याचे आढळले. थ्रेशर गिरण उत्तम स्थितीत चालू असून किराणा मालाच्या दुकानातही मिळालेल्या कर्जाच्या मानाने माल भरलेला आहे. दुग्ध व्यवसायासाठी कर्ज घेतलेल्या २ ते ३ लाभार्थ्यांच्या म्हशी मेल्या असून त्यांना त्याबदली पशुधन विमा योजनेमुळे पुन्हा म्हशी देण्यात आलेल्या आहेत. वाटप केलेल्या शेळी गटापैकी काही थोडया शेळया मरण पावलेल्या असल्यातरी हयात असलेल्या शेळया चांगल्या स्थितीत आहेत.

## क) कर्जासाठी योजनेची निवड

कर्ज घेण्यासाठी व्यवसाय निवडतांना दुग्ध व्यवसायाची निवड करणा-या लाभार्थ्यांच्या जमिन धारणेकडे दृष्टीक्षेप टाकला असता दुग्ध व्यवसायाच्या १२९ लाभार्थ्यांपैकी ३४ लाभार्थी भूधारक असून हे प्रमाण जवळपास २६% आहे. धुळे जिल्हयातील शिरपूर तालुक्यात जमिन धारणेचे प्रमाण १४ % इतके अत्यल्प असतांना एकूण २८ लाभार्थ्यांपैकी २० म्हणजे ७१ % लाभार्थ्यांनी दुग्धव्यवसायासाठी कर्ज घेतले आहे.

यावरुन असे दिसते की लाभार्थी, योजना घेतांना वैयक्तिक स्थितीचा व सभोवताली उपलब्ध असणा-या साधन सामग्री व इतर बार्बीचा फारसा विचार करीत नाहीत. आजुबाजुच्या चार जणांनी घेतली म्हणून लाभार्थी योजना स्विकारतात.भाजी व फळे विकणा-या महिला लाभार्थी वगळता इतर सर्व योजनांबाबत बहुतांशी लाभार्थ्यांची हिच स्थिती आहे.

शेळीपालन व्यवसायासाठी कर्ज घेतलेल्या नंदूरबार जिल्हयातील शहादा तालूक्यातील काही लाभार्थ्यांनी शेळीपालन व्यवसायात नविन शेळयांची पैदास होई पर्यंतच्या अवधित योजनेचा काहीच फायदा मिळत नसल्याची तक्रार केली. असे असले तरी ब-याच लाभार्थ्यांना ही योजना किफायतशीर वाटली असल्याचे दिसून आले.

---**---

## ११) पशुधन

नंदूरबार व धुळे जिल्हयातील १६५ लाभार्थ्यांपैकी १२९ म्हणजे ७८ % लाभार्थ्यांनी दुग्ध व्यवसाय योजना स्विकारल्याने त्यांच्याकडे दुभत्या गाई व म्हशी असल्याचे दिसून येते.

योजनानिहाय लाभार्थ्यांकडील पशुधन खालील प्रमाणे :-

**तक्ता क्र. ३.१०**

| अ. क्र. | तालुका/जिल्हा | एकुण लाभार्थी | दुग्ध-व्यवसाय योजना लाभार्थी | शेळी - पालन | एकूण गाई | एकूण म्हशी | बैल | शेळी - मेंढी | कोंबडी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शिरपूर | २८ | २० | ४ | ४ | १७ | १६ | ४० | १२ |
| २. | साक्री | १३ | ० | ० | ५ | ३ | १२ | ५ | ३ |
| ३. | धुळे एकूण | ४१ | २० | ४ | ९ | २० | २८ | ४५ | १५ |
| ४ | अक्राणी | २४ | २१ | ३ | ६ | २७ | ० | ४३ | ६ |
| ५ | शहादा | २१ | १४ | ७ | - | १५ | २ | ४० | २७ |
| ६ | तळोदा | १८ | १४ | - | ९ | ५ | ४ | ९ | १० |
| ७ | अक्कलकुवा | २७ | २७ | - | ९ | ३८ | ८ | ९ | ६४ |
| ८ | नवापुर | २० | १९ | - | २ | ३० | ११ | १० | ७० |
| ९ | नंदूरबार | १४ | १४ | - | २ | २८ | ६ | ८ | ३१ |
| १० | नंदूरबार एकूण | १२४ | १०९ | १० | २८ | १४३ | ३१ | ११९ | २०८ |
| | **एकूण** | **१६५** | **१२९** | **१४** | **३७** | **१६३** | **५९** | **१६४** | **२२३** |

एकूण दुग्ध व्यवसाय स्विकारलेलें लाभार्थी १२९ असून त्यांच्याकडे १६३ म्हशी आहेत. दुग्ध व्यवसाय योजनेत लाभार्थ्यांना म्हशी देण्यात आल्या आहेत. त्यामुळे दुग्धव्यवसायात मिळालेल्या १२९ म्हशी वगळता १६५ लाभार्थ्यांकडे योजनेपुर्वी ३७ गाई व ३४ म्हशी होत्या म्हणजेच योजनेपुर्वी ४३ % कुटंबे दुभती जनावरे बाळगुन होती असे वरिल तक्त्यावरुन दिसते

एकूण ५७ लाभार्थी भुधारक असुन लाभार्थ्यांजवळ असलेल्या बैलांची संख्या ५९आहे. म्हणजेच ज्यांना शेती करणे शक्य आहे त्यांनी शक्यतो बैल पाळले आहेत.

एकूण १४ लाभार्थ्यांना शेळी गटांचे ( १० + १) वाटप करण्यात आले आहे. म्हणजेच १४ x ११= १५४ शेळया योजनेतुन देण्यात आल्या असून योजनेशिवाय केवळ १० शेळयामेंढया आढळल्या आहेत.म्हणजेच लाभार्थ्यांकडे योजनेपुर्वी शेळया व मेंढयाही नव्हत्या असे दिसून येते.

कोंबडयांची संख्या पहाता त्यांचे प्रमाण घरटी सरासरी एकच पडते. आदिवासींची कोंबडया पाळून उपजिविका करण्याची प्रवृत्तीच दिसून येत नाही. हया प्रवृत्तीत वाढ करण्यासाठी ईच्छूक लाभार्थींना कोंबडयांचे वाटप त्यांच्या आर्थिक सहभागासहित करणे योग्य वाटते.

थोडक्यात आदिवासींकडील पशुधनाची संख्या नगण्य आहे. त्यामुळे दुध दुभते, अंडी, मटण हया जीवनावश्यक वस्तूच्या बाबींची उपलब्धता त्याच्या जीवनात असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे कुपोषणासारख्या घटनाना आदिवासींना वारंवार सामोरे जावे लागते. योजनेमुळे ८० % कुटूंबांना म्हशी मिळाल्याने त्यांच्या घरात दुध वापरण्याच्या प्रमाणात निश्चितच वाढ झाली आहे. घरचेच दूध दुभते असल्यानंतर स्वाभाविकपणे दुध घरात वापरले जाते. दुग्ध व्यवसायाच्या १२९ लाभार्थ्यांपैकी १०० लाभार्थी घरामध्यें १ / २ लिटर दूध वापरतात.

दुधाची उपलब्धता मुलांच्या कुपोषणाच्या आलेखाच्या चढत्या कलास रोखेल व ही फार महत्वाची बाब योजना देण्यातुन साधली जात आहे हे निश्चित.

---**---

## १२) कर्जपरतफेड

नंदूरबार व धुळे जिल्हयातील एकुण १६५ लाभार्थ्यांनी स्वर्णजयंती रोजगार योजनेंतर्गत कर्ज घेतले आहे. हया कर्जाची परतफेड करण्यासाठी लाभार्थ्यांचे उत्पन्नात वाढ होणे आवश्यकच होते. याखेरीज ते कर्जफेड करुच शकत नव्हते. दुग्धव्यवसायासाठी कर्ज घेतलेल्या लाभार्थ्यांची संख्या मोठी असल्याने व त्यातुन रोजचे उत्पन्न लगेच सुरु झाल्याने कर्जाची नियमितपणे परतफेड करणा-यांची संख्या लक्षणिय असून कर्जाची थकबाकी असलेले लाभार्थी मुख्यत्वे शेळीपालन हया व्यवसायातील आहेत. शेळीच्या पैदाशिस अवधी लागत असल्याने लगेच उत्पन्न सुरु होत नाही त्यामूळे शेळी गट वाटपाच्या लाभधारकाची कर्ज परतफेडीची थकबाकी असल्याचे दिसून येते.

**तक्ता क्र. ३.११**

**कर्जफेडीची स्थिती**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकुण लाभार्थी | परतफेड | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नियमित % (कंसातील आकडे % दर्शवितात) | पूर्ण फेड | थकबाकीदार | अनियमित |
| १ | धुळे | १.शिरपूर | २८ | २६(९३) | १ | १ | ० |
| | | २.साक्री | १३ | ९(६९) | ० | ० | ४ |
| जिल्हा धुळे | | | ४१ | ३५(८५) | १ | १ | ४ |
| २ | नंदूरबार | १.अक्राणी | २४ | १५(६२) | ६ | ३ | ० |
| | | २.शहादा | २१ | १७(८१) | ० | ४ | ० |
| | | ३. तळोदा | १८ | १६(८९) | १ | १ | ० |
| | | ४.अक्कलकुवा | २७ | २३(८५) | ० | ४ | ० |
| | | ५.नवापूर | २० | २०(१००) | ० | ० | ० |
| | | ६.नंदूरबार | १४ | १४(१००) | ० | ० | ० |
| जिल्हा नंदूरबार | | | १२४ | १०५(८५) | ७ | १२ | ० |
| एकूण धुळे व नंदूरबार | | | १६५ | १४०(८५) | ८ | १३ | ४ |
| टक्केवारी | | | | ८५ | ५ | ८ | २ |

पहाणी केलेल्या १६५ लाभार्थ्यांपैकी ८५ % लाभार्थ्यांनी कर्ज फेड नियमित केल्याचे आढळते हे प्रमाण दोन्ही जिल्हयात सारखेच आढळते. पण नवापूर व नंदूरबार तालूक्या मधील सर्वच्या सर्व लाभार्थ्यांनी नियमितपणे कर्जफेड केली आहे. शिरपूर तालुक्यात सुदधा ९३% लाभार्थ्यांनी कर्जफेड नियमितपणे केली आहे.

मात्र धुळे जिल्हयातील साक्री व नंदूरबार जिल्हयातील अक्राणी तालुक्यात नियमितपणे कर्जफेड करणा-यांची संख्या ७०% पेक्षा कमी आढळते. अक्राणी तालुक्यात नियमित परतफेडीचे हे प्रमाण कमी असले तरी २५% लाभार्थ्यांनी कर्जाची पुर्ण फेड केली आहे. शिरपूर व तळोदयामध्ये देखिल प्रत्येकी १ लाभार्थ्यांने कर्जाची पुर्णफेड केली आहे. ही विशेष बाब आहे.

पहाणी केलेल्या ८ तालुक्यात एकूण १३ थकबाकीदार आहेत परंतू साक्री, नवापूर व नंदु मध्ये एकही थकबाकीदार नाही. ,असे असले तरी केवळ साक्री तालुक्यातच ४ लाभार्थी कर्जफेडीचे मात्र अनियमितपणे भरतात.

एकुण कर्जफेडीची स्थिती पहाता स्वर्णजयंती रोजगार योजनेतुन घेतलेल्या कर्जाची लाभार्थ केलेल्या परतफेडीची स्थिती समाधानकारक आहे. यावरुन असे दिसून येते की, क्वचित अप वगळता, आदिवासी लाभधारकांना कर्जाची परतफेड करण्याची जाणीव आहे.

---**---

## १३)लाभधारकाचे उत्पन्न व आर्थिक स्थिती

दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना "स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार" योजनेत रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने दुधाळ जनावरांचा पुरवठा करण्यात आला तर काही लाभार्थ्यांना शेळीपालन व्यवसायासाठी शेळी गटाचे वाटप करण्यात आले. धुळे व नंदूरबार जिल्हयातील पहाणी केलेल्या एकूण १६५ लाभार्थ्यांपैकी या दोन योजनांचा जास्तीत जास्त म्हणजें १२९ लाभार्थ्यांनी (७८%) लाभ घेतला असून इतर योजनांचा केवळ २२ % लाभांर्थ्यांनी लाभ घेतला आहे. दुग्धव्यवसायामुळे ब-याच लाभार्थ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे असे आढळते

दुधाळ जनावरांचा पुरवठा या योजनेचा लाभ घेणा-या काही लाभार्थ्यांच्या उत्पन्नात वाढ न होण्याच्या कारणांचा अभ्यास केल्यास प्रामुख्याने निदर्शनास आलेली कारणे १) म्हशीने दूध कमी देणे २) म्हैस मरणे ३) म्हैस भाकड निघणे ४) चारा विकत घ्यावा लागणे इत्यादी आहेत. भुमिहीन लाभार्थ्यांना दुधाळ जनावरांसाठी आवश्यक तेवढे खाद्य पुरविणे जिकीरीचे होते, त्यामुळे जनावरांची उपासमार होऊन त्याचा थेट परिणाम लाभार्थ्यांच्या उत्पन्नावर होत असल्याचे दिसून येते.

ज्या काही लाभार्थ्यांचे मासिक उत्पन्न रु. १२५०/- ते १८००/- च्या दरम्यान होते अशा लाभार्थ्यांच्या उत्पन्नात दुधाळ जनावरांमुळे वाढ होऊन ही कुटूंबे दारिद्रय रेषेच्या वर येण्यास मदत झाली आहे. त्याचप्रमाणे शेळीपालन या व्यवसायास अनुदान घेतलेल्या लाभार्थ्यांचे उत्पन्नात फारशी वाढ झाली नाही असे आढळले. कारण सर्वेक्षणातील ही योजना स्विकारलेले लाभार्थी चालू वर्षातील असून (शेळी मिळाल्यापासून ती व्यायली नसल्यामुळे) तिच्यापासून नविन करडै पैदा होण्यास आणखी काही कालावधीची गरज आहे. नविन पैदास न झाल्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ झाली नाही. मात्र असे असले तरी पुर्वीच्या अनुभवावरुन ही योजना फायदेशिर असल्याचा निर्वाळा इतर लाभार्थ्यांनी दिला आहे. शेळयांची विशेष देखभाल करावी लागत नसल्याने तसेच त्यांना विशेष आहार द्यावा लागत नसल्याने उपलब्ध असलेल्या भोवतीच्या परिसरात त्यांची गुजराण होऊ शकते., म्हणून व दुध काढून ते काळजी पुर्वक निगूतीने दुधसंकलन केंद्रापर्यंत पोचविणे हया किचकट प्रक्रियेची सवय नसल्याने दुध विकण्यापेक्षा करडेच विकता येत असल्याने मुळातच अल्प उत्पन्न असलेल्या भूमिहीन कुटूंबांना ही योजना लाभदायक वाटते.

योजना मिळण्यापुर्वी नंदूरबार जिल्हयातील १२४ लाभार्थ्यांपैकी ८२ लाभार्थ्यांचे मासिक उत्पन्न रु.२/- हजारापेक्षा कमी आहे. मासिक उत्पन्न रु.२/- हजारापेक्षा जास्त असलेल्या १९ लाभार्थ्यांचे उत्पन्न जास्त म्हणजे रु.२५००/-पर्यंतच आहे. केवळ ३ लाभार्थ्यांचे मासिक उत्पन्न रु.४/- हजारापेक्षा जास्त असलेले आढळले.

नेमके सांगायचे तर नंदूरबार जिल्हयातील ज्यां लाभार्थ्यांचे मासिक उत्पन्न योजनेपुर्वी रु.१/- हजारापेक्षा कमी होते, त्यांच्या मासिक उत्पन्नात "स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगारमुळे" वाढ झाली असे निदर्शनास आले. असे असले तरी हया कुटूंबाच्या मासिक उत्पन्नात इतकी वाढ झाली नाही की ती कुटूंबे दारिद्रय रेषेच्यावर येतील, म्हणजेच हया लाभार्थ्यांचे उत्पन्न रु.१५००/- ते १८००/- पर्यंत गेले पण ते रु.२०००/- पातळी गाठू शकले नाही.

नंदूरबार जिल्हयातील १२४ लाभार्थ्यांपैकी योजनेपुर्वी रु.२/- हजारापेंक्षा कमी मासिक उत्पन्न असलेले लाभधारक ८२ असून याची एकूण लाभधारकाशी टक्केवारी ६६% आहे तर योजने नंतरही त्यापैकी ३५ म्हणजेच ४३% लाभधारकांचे मासिक उत्पन्न रु.२/- हजारापेक्षा कमीच राहीले त्यामुळे जरी लाभधारकाचे उत्पन्न वाढले असले तरी हे लाभार्थी दारिद्रय रेषेच्यावर येऊ शकले नाहीत

तसेच योजनेपुर्वी २३ लाभार्थ्यांचे मासिक उत्पन्न अगदी नेमके रु.२/- हजारच होते. त्यापैकी १४ लाभार्थ्यांच्या मासिक उत्पन्नात वाढ झालेली नसल्याचे दिसुन आले.

थोडक्यात योजनेपुर्वीही १२४ पैकी १०५ म्हणजें ८५% लाभार्थ्यांचे मासिक उत्पन्न रु. २/- हजार किंवा त्यापेक्षा कमी होते व योजनेनंतरही ४९ म्हणजें ४०% लाभार्थ्यांचे मासिक उत्पन्न रु २/-हजार किंवा त्यापेक्षा कमी राहीलेले आढळले. नंदूरबार जिल्हयात ४०% लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितींत फारसा फरक पडला नाही.

धुळे जिल्हयातील शिरपूर तालुक्यात योजना मिळण्यापुर्वी काही लाभार्थ्यांचे मासिक उत्पन्न रु. ८००/- पेक्षा सुध्दा कमी असल्याचे आढळले तर काहींचे मासिक उत्पन्न रु ३५००/- रुपयांपर्यंत असल्याचे निदर्शनास आले. याच जिल्हयातील साक्री तालुक्यातील काही लाभार्थ्यांचे मासिक उत्पन्न रु.१/-हजारापर्यंत असून शिरपूर प्रमाणेच याही तालुक्यात मासिक उत्पन्न जास्तित जास्त रु.३५००/- उत्पन्न असणा-या लाभधारकांनी सुध्दा या योजनेचा लाभ घेतला असल्याचे दिसुन आले.

इतर योजनांमध्ये धुळे जिल्हयातील साक्री तालुक्यात "**भाजीपाला व केळी विक्री**" या योजनेंमुळे लाभधारकांना तात्काळ उत्पन्न सुरु झाले असून त्यांच्या मासिक उत्पन्नात निश्चितपणे वाढ झाली आहे. सर्वच्या सर्व ७ लाभार्थ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली असुन पैकी ६० % लाभार्थी दारिद्रय रेषेच्यावर आले आहेत ४० % लाभार्थ्यांच्या उत्पन्नातही लक्षणिय वाढ झाली आहेच. हया योजनेमुळे कमी वेळात जास्तित जास्त उत्पन्नाचा लाभ होत असून नियमितपणे रोजगाराची हमी मिळाली आहे. हया व्यवसायाच्या प्रगतीसाठी अधिक अनुदान उपलब्ध होण्याची गरज सर्व लाभार्थ्यांनी निदर्शनास आणून दिली असुन हया व्यवसायाचा लाभ घेणा-या गटाकडून कर्जफेडही नियमितपणे केली जात आहे.

धुळे जिल्हयातील साक्री तालुक्यातील खताचे दुकान हया योजनेच्या लाभार्थ्यांची पाहणी केली असता खताचे दुकान मिळालेल्या अनुदानाची परिणिती मासिक उत्पन्नात वाढ होण्यात झाली असली तरी कुटूंबाचे मुख्य व्यवसायाचे उत्पन्न फारच कमी असल्याने सदर कुटूंब दारिद्रय रेषेवर येण्यासाठी खताचा पुरवठा भरपुर व वेळेवर व्हावा अशी लाभधारकाची मागणी आहे.

थ्रेशर, पिठाची गिरणी व भात भरडण्याची गिरणी हया बाबीसाठी धुळे जिल्हयातील साक्री तालुक्यात काही लाभार्थ्यांनी अनुदान घेतले असून यामुळे लाभधारकांना चांगलाच फायदा झाला आहे. त्यांच्या उत्पन्नात लगेच वाढ झाली नसली तरी त्यांना हया धंदयातुन फायदा होत असून झालेला आर्थिक लाभ त्यांनी हया धंदयाच्या भांडवली गुंतवणूकीसाठी वापरला आहे. ही योजना एका बचत गटाला एकत्रितपणे दिली असून त्यामुळे अनेक लाभार्थी एकत्र आले आहेत. त्यामुळे लाभार्थ्यांच्या एकीत वाढ होऊन विचारांची देवाणघेवाण व सहकार्याची भावना रुजत आहे. धुळे जिल्हयातील शिरपूर तालुक्यात " पशुखादय विक्री " या बाबीसाठी अनुदान देण्यात आलेल्या ५ लाभार्थ्यांची पाहणी केली असता ही योजना लाभदायक असल्याचे लाभधारकाकडून सांगण्यात आले. ज्या गावात "दुधाळ जनावरांचा पुरवठा" ही योजना राबविली आहे त्या गावात "**पशुखादय विक्री**" ही योजना देणे अधिक फायदेशीर ठरेल.

किराणा मालाचे दुकान यासाठी अनुदान मिळालेल्या लाभार्थ्यांच्या उत्पन्नात नियमितपणे वाढ झाली आहे. परंतू ही योजना देण्यासाठी थोडेफार शिक्षण घेतलेल्या युवकांची निवड करणे योग्य ठरेल.

नंदूरबार जिल्हयातील अक्राणी तालुक्यात 'मोठी सुरवाणी' हया गावात, पोस्टमास्तर व अंगणवाडी मदतनिस असलेल्या कुटूंबास तसेच मुंदलवाड गावातील इंजिनिअरींगचा डिप्लोमा धारक जो

कॉन्ट्रॅक्टरचा व्यवसाय करतो त्यास तसेच हयाच गावातील एका कुटूंबातील एका जोडप्यातील एक कॉलेज शिपाई व एक अंगणवाडी सेविका असलेल्या कुटूंबास हया योजनांचा लाभ देण्यात आला आहे.हया कुटूंबाचे मासिक उत्पन्न रु.२५००/- पेक्षा जास्त आहे.

धुळे जिल्हयातील शिरपूर तालुक्यात २८ लाभार्थ्यांची पाहणी केली त्यापैकी ७ लाभार्थ्यांचे मासिक उत्पन्न योजनेपुर्वीच रु.२/- हजार किंवा त्यापेक्षा थोडे जास्त होते. त्यांच्यापैकी ६ लाभार्थ्यांनी दुग्ध व्यवसायासाठी कर्ज घेतले होते हया सर्व ७ लाभार्थ्यांच्या मासिक उत्पन्नात योजनेनंतर साधारणपणे रु. १७५/- वा त्यापेक्षा जास्त वाढ झालेली आढळली आहे.

शिरपूर तालुक्यात पाहणी केलेल्या २८ लाभार्थ्यांपैकी २१ लाभार्थ्यांचे मासिक उत्पन्न योजनेपुर्वी रु.२/- हजारापेक्षा कमी होते त्यांच्या उत्पन्नात योजनेनंतर वाढ होऊन हे २१ लाभार्थी दारिद्रय रेषेच्या वर आलेले आहेत. त्यांच्यापैकी १३ जणांनी ( ६२%) दुग्ध व्यवसायासाठी अनुदान घेतले असून ४ जणांनी ( १९%) "शेळीपालन व्यवसाय " व ४ जणांनी (१९%) "पशुखादय विक्री व्यवसाय" यासाठी अनुदान घेतले आहे.

हया शिरपूर तालुक्यात योजनेपुर्वी दारिद्रय रेषेखाली असलेल्या ४ लाभार्थ्यांपैकी ३ लाभार्थ्यांच्या मासिक उत्पन्नात नगण्य वाढ झाली आहे. व ते दारिद्रय रेषेच्यावर येऊ शकले नाहीत. त्यापैकी २ जणांनी दुग्धव्यवसायासाठी अनुदान घेतले होते.

थोडक्यात धुळे जिल्हयातील शिरपूर तालुक्यात स्वर्ण जयंती रोजगार योजनेचा लाभार्थ्यांना चांगलाच फायदा झाला असून पहाणीच्यावेळी दारिद्रय रेषेच्या खाली असलेल्या २१ लाभार्थ्यांपैकी १७ लाभार्थी दारिद्रय रेषेच्यावर आले आहेत. व हे प्रमाण ८१% आहे.

नंदूरबार व धुळे जिल्हयातील एकूण १६५ लाभार्थ्यांची योजना मिळण्यापुर्वीची व योजना मिळाल्यानंतरची आर्थिक स्थिती खालील तक्त्यात दिली आहे.

---**---

तक्ता क्र. ३.१२

## धुळे व नंदूरबार जिल्हयातील लाभार्थ्यांची आर्थिक स्थिती

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | उत्पन्न गट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | दारिद्रय रेषेखालील लाभार्थी (मासिक उत्पन्न रु.२०००/- पेक्षा कमी) | | मासिक उत्पन्न रु. २०००/- असणारे लाभार्थी | | मासिक उत्पन्न रु. २०००/- पेक्षा जास्त असलेले लाभार्थी | |
| | | | योजने - पुर्वी | योजनेनंतर | योजने- पुर्वी | योजने- नंतर | योजने - पुर्वी | योजनेनंतर |
| १) | धुळे | शिरपूर | २१ | ४ | ३ | ३ | ४ | २१ |
| | | साक्री | १२ | ७ | ० | १ | १ | ५ |
| | | एकूण | **३३** | **११** | **३** | **४** | **५** | **२६** |
| २) | नंदूरबार | अक्राणी | १४ | १० | ६ | ३ | ४ | ११ |
| | | शहादा | ११ | ७ | ३ | २ | ७ | १२ |
| | | तळोदा | १५ | ४ | ३ | २ | ० | १२ |
| | | अक्कल कुवा | १७ | ६ | ५ | ३ | ५ | १८ |
| | | नवापूर | १३ | ३ | ६ | ३ | १ | १४ |
| | | नंदूरबार | **१२** | **५** | **०** | **१** | **२** | **८** |
| एकूण | | | **८२** | **३५** | **२३** | **१४** | **१९** | **७५** |


वरिल तत्क्यावरुन असे दिसते की, नंदूरबार जिल्हयात दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांपैकी ४७ लाभार्थ्यांची आर्थिक स्थिती सुधारली व केवळ ३५ चे मासिक उत्पन्न रु. २०००/- पेक्षा कमी राहीले. १९ लाभार्थ्यांचे उत्पन्न रु.२०००/- पेक्षा जास्त होते. योजना मिळाल्यावर त्यात वाढ होऊन एकुण ७५ लाभार्थ्यांचे उत्पन्न रु.२०००/- चे वर गेल्याचे आढळते.

धुळे जिल्हयातील दारिद्रय रेषेखालील ३३ लाभार्थ्यांपैकी २२ लाभार्थ्यांचे उत्पन्नात वाढ होऊन मासिक उत्पन्न रु. २०००/- किंवा त्यापेक्षा जास्त झाले. योजनेपूर्वी ५ लाभार्थ्यांचे उत्पन्न रु.२०००/- पेक्षा

जास्त होते. योजनेनंतर त्यात २१ लाभार्थ्यांची भर पडली असून रु.२०००/- पेक्षा मासिक उत्पन्न जास्त असलेल्या लाभार्थ्यांची संख्या २६ झाली असल्याचे आढळते.

---**---

मासिक उत्पन्न २०००.चा पेक्षा जास्त



# प्रकरण - ४

## योजना राबविण्यातील अडचणी / उपाययोजना

### १) खत व बी बियाणे विक्री व्यवसाय अनुदान

या बाबीसाठी अनुदान देण्यात आलेल्या व्यवसायास, खताचा पुरेसा व वेळेवर पुरवठ होत नाही., असे लाभधारकाकडून सांगण्यात आले. योजना अंमलबजावणीतील ही अडचण आहे.

खताचा पुरवठा पुरेसा आणि वेळेवर केल्यास या व्यवसायापासून चांगला लाभ मिळेल असे लाभधारकाकडून सांगण्यात आले. त्यासाठी पुरवठा वेळेवर व पुरेसा करण्याच्या दृष्टीने कार्यवाही होणे आवश्यक वाटते.

### २) दुधाळ जनावरांचा पुरवठा

गाई व म्हशी या दुभत्या जनावरांचा पुरवठा करतेवेळी संकरित गाई व म्हशीचा पुरवठ केला जातो. या संकरित किंवा विदेशी जनावराना सांभाळण्याचा खर्च जास्त असतो त्यांन वेळोवेळी औषध उपचार करणे, पशुखाद्य देणे, त्यांची निगा राखणे हे आदिवासी लाभधारकास सहज शक्य होत नाही.यासाठी दुभत्या जनावराचा पुरवठा करतेवेळी स्थानीक वाणाच्या चांगल्या प्रतीची जनावरे देणे, तसेच लाभधारकास पशुधनाचे संगोपन कसे करावयाचे याचे २-४ दिवसाचे प्रशिक्षण देणे, पशूखाद्य पुरविणे या बाबींकडे योजना देतांना प्राधान्याने लक्ष दिल्यास व प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यास ही योजना किफायतशीर होऊ शकेल.

### ३) भाजी व केळी विक्री व्यवसायास अनुदान

लाभधारकास योग्य व सोयीचा व्यवसाय करण्यासाठी अनुदान दिले जाते. त्यानुसार भाजी व केळी विक्री व्यवसायाकरिता देण्यात येत असलेल्या अनुदानात वाढ करावी असे लाभ धारकाकडून सांगण्यात आले. अनुदानाची रक्कम वाढविण्याच्या अनुषंगाने राज्यस्तरावर विचार विनिमय करुन अनुदान वाढविल्यास योजना प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टिने योग्य राहील असे वाटते.

---**---

# प्रकरण - ५

## सारांश

धुळे व नंदूरबार हया दूर्गम आदिवासी क्षेत्रातील आदिवासींच्या करीता राबविण्यात आलेल्या शासकिय योजनाच्या अंमलबजावणीच्या पहाणीचा सारांश

१) **पाहणी केलेल्या योजना :-** दुधाळ जनावरांचा पुरवठा, खतविक्री, पशूखाद्यविक्री, शेळीपालन, भाजी व केळी विक्री, थ्रेशर गिरण, किराणा दुकान या बाबीसाठी लाभधारकांना देण्यात आलेल्या कर्ज व अनुदानामुळे झालेल्या लाभाची प्रत्यक्ष पहाणी केली.पहाणीत एकूण १६५ लाभार्थ्याची माहिती घेतली आहे.

२) **महिला बचत गटाना प्राधान्य:-** कर्ज व अनुदान देताना मुख्यतः बचत गटांना व त्यातही विशेष करुन महिला बचत गटाना प्राधान्य देऊन वाटप करण्यात आले आहे. पहाणीतील १६५ लाभधारकांपैकी १५० लाभार्थी महिला बचत गटाच्या असून त्यांची टक्केवारी ९० टक्के आहे.

३) **भूधारणाः-** पहाणीतील १६५ लाभधारकापैकी ५७ लाभधारक ( ३५%) भूधारक आहेत.

४) **साक्षरताः-** पहाणीतील १६५ कुटूंबाची साक्षरता ३५% आहे.

५) **योजनेची निवड :-** पहाणीतील लाभधारकापैकी ८६% लाभधारकानी दुभती जनावरे व शेळी वाटप या बाबीसाठी कर्ज व अनुदान घेतलेले आहे.

६) **कर्ज परतफेड :-** एकुण १६५ लाभार्थ्यापैकी १४० लाभधारक (८५% ) योजनेतंर्गत नियमीत परतफेड करतात ,८ लाभधारकांनी (५%) पुर्णतः कर्ज परतफेड केली आहे.थकबाकीदार १३ लाभधारक (८%) असुन अनियमीत परतफेड करणारे ४ लाभधारक (२%) आहेत.

**उत्पन्न -** योजनेमुळे, पहाणीतील १६५ लाभधारकांपैकी ११९ लाभधारकांच्या उत्पन्नात वाढ होऊन दारिद्रय रेषेच्यावर आले आहेत.

---**---

# निष्कर्ष

"स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार" योजनेंतर्गत आदिवासी कुटूबांना अनुदान व कर्ज देऊन सदर कुटूंबांना दारिद्रय रेषेच्यावर आणण्याच्या दृष्टीने केलेल्या प्रयत्नांचा सकारात्मक परिणाम झालेला आढळतो.

१) दारिद्रय रेषा ओलांडणे : - दारिद्रय रेषेखालील कुटूंबांना दारिद्रय रेषेच्यावर आणण्यासाठी राबविण्यात आलेल्या योजनांच्या अंमलबजावणीमुळे, पहाणी केलेल्या १६५ कुटंबापैकी ११९ कुटूंबे दारिद्रय रेषेच्यावर आली आहेत. म्हणजे ७२% कुटूंबे दारिद्रय रेषेच्यावर आली आहेत. योजनेत लाभधारकाची निवड योग्यरितीने करुन वेळेत अर्थसहाय्य व कर्ज देऊन परिणामकारकरित्या अंमलबजावणी केल्यास या योजनेचा आणखी चांगला उपयोग होईल.

२) निकषांचे पालन :- योजना राबवितेवेळी शासनाकडून घालून देण्यात आलेल्या निकषांचे पालन करण्यात आले आहे. जसे योजनेमध्ये महिलांचा ५०% सहभाग घेणे, बचत गटांना प्राधान्य देणे या बाबीचे अनुपालन करण्यात आले असल्याचे दिसून आले आहे.

३) अडचणी व उपाय :- योजनेची अंमलबजावणी करते वेळी येणा-या अडचणी व उपाय याबाबत प्रकरण ६ मध्ये माहिती देण्यात आली आहे.

---**---

## दारिद्रय रेषेखालील आदिवासी लाभार्थ्यांना दारिद्रय रेषेच्या वर आणण्यासाठी "स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार" योजनेचे मुल्यमापन

### कुटूंबपत्रक

१. लाभार्थ्याचे नांव :- ---------------------------------------- गांव / पाडा --------
तालुका -------------------------- जिल्हा ----------------------------
वय वर्ष ------- ------------------ अनु.जमातीचे नांव ----------------

२. कुटुंब दारिद्रय रेषेखालील आहे काय ? | होय | नाही |
असल्यास दारिद्रय रेषेखालील यादीतील क्रमांक
१९८१-८२ चा क्रमांक :-
१९९७-९८ चा क्रमांक :-
२००१ चा क्रमांक :-
वरीलपैकी ज्या यादीतील क्रमांक आहे तो क्रमांक लिहावा

३. कुटुंबातील व्यक्तीची माहिति

| अ. क्र. | नांव | पुरुष/स्त्री | कुटुंब प्रमुखांचे नाते | वय | शिक्षण | व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

४. कुटुंबास स्वर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेंतर्गत कर्ज व अनुदान मिळाले आहे. त्या व्यवसायाचे नांव -------------------------------------

५. कोणत्या वर्षी कर्ज व अनुदान मंजूर झाले ते वर्ष ------------------- मंजूर दिनांक ------
मंजूर कर्ज रक्कम ----------------- अनुदान रक्कम --------------------

६. लाभधारक वैयक्तिक लाभ योजनेचा सदस्य आहे का. होय / नाही
बचत गटाचा सदस्य आहे का. होय / नाही

१. यापुर्वी सुवर्ण जयंती ग्राम स्वयं रोजगार किंवा एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम या योजनेचा लाभ घेतला आहे का ? | होय | नाही |
२. होय असल्यास लाभ घेतलेले वर्ष
३. कोणत्या बाबीसाठी अनुदान प्राप्त झाले त्या बाबीचे नांव
४. यापुर्वी या योजने अंतर्गत घेतलेल्या कर्जाची परतफेड केली आहे का ? | होय | नाही |

५. नाही असल्यास कर्ज परत फेड न करण्याची कारणे

| | | |
|---|---|---|
| १. | व्यवसाय सुरु केला पण व्यवस्थित चालू नसल्यामुळे बंद पडला | |
| २. | मंजूर कर्ज व अनुदान प्राप्त झाले नाही | |
| ३. | मंजूर कर्ज व अनुदान इतर कारणासाठी खर्च करण्यांत आले . | |
| ४. | मंजूर कर्ज पुरेसे नसल्यामुळे व्यवसाय योग्यरित्या चालविता येत नाही | |
| ५. | मंजूर कर्जाचा पहिला/ दुसरा हप्ता प्राप्त झाला परंतु नंतरचा हप्ता मिळाला नाही. | |
| ६. | दुसरी नोकरी मिळाल्यामुळे व्यवसाय बंद पडला आहे. | |
| ७. | इतर कारणे | |

७. लाभधारक बचत गटातील सदस्य असल्यास खालील माहिती लाभधारकास विचारणा करुन घ्यावी.

१. बचत गटात असलेल्या सदस्यांची संख्या

बचत गटात सर्व सदस्य दारिद्रय रेषेखाली आहेत का — होय | नाही

२. दारिद्रय रेषेखाली नसलेले सदस्य बचत गटात असतील याची माहिती घ्यावी.

दारिद्रय रेषेखालील सदस्य संख्या — सदस्य संख्या ----

दारिद्रय रेषेखाली नसलेल्या सदस्याची संख्या — सदस्य संख्या ----

८. बचत गट स्थापन केल्याची तारीख --------------वर्ष ------------ महिना ----------------

९. बचत गट पुरुषांचा आहे की महिलांचा — पुरुष | महिला

१०. बचत गट स्थापनेनंतर किती कालावधीनंतर ग्रेडेशन मिळाले — कालावधी | महिने

११. बचत गटास ग्रेडेशन प्राप्त झाल्यानंतर भांडवली अनुदान व कर्ज मिळाले का ? होय असल्यास अनुदान रक्कम ----------------- कर्ज रक्कम ---------------

नाही असल्यास न मिळाल्याची कारणे :-

(योग्य त्या बाबीस ✓, अशी खुण करावी )

१. प्रकरण जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेस प्रलंबित
२. बॅकेत प्रस्ताव सादर पण मंजूरी नाही
३. बचत गटाकडून कागदपत्रे सादर करण्याचे राहिल्यामुळे मंजूरी नाही .
४. इतर

१२. बचत गटास मुख्य व्यवसायाकरीता (कि ॲक्टीव्हीटीज) कर्ज मिळाले का ? — होय | नाही

१३. होय असल्यास कोणत्या व्यवसायासाठी कर्ज मिळाले त्या व्यवसायाचे नांव -------------
----------------------------------

कर्जाची रक्कम -------------------मंजूर दिनांक-----------------

कर्ज मंजूर ज्या बॅकेकडून झाले त्या बॅकेचे नांव ----------------

१४. नाही असल्यास न मिळाल्याची कारणे(योग्य त्या बाबीस ✔ अशी खुण करावी)

१. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयात मंजूरीसाठी प्रलंबित

२. प्रस्ताव सादर करावयाचा आहे.

३. प्रस्ताव नुकताच सादर केला आहे.

४. प्रस्ताव बॅकेत प्रलंबित आहे.

५. बॅकेतील त्रुटीची पुर्तता करण्याचे प्रलंबित आहे.

६. मागणीप्रमाणे कर्जाची रक्कम मंजूर होत नाही.

७. इतर कारणे

१५. योजना मंजूरीमुळे लाभधारकांचे साधारणपणे मासिक उत्पन्न रक्कम रुपये --------------
------

योजना मंजूरीपुर्वी लाभधारकाचे मासिक उत्पन्न रुपये -----------

योजनेमुळे उत्पन्नात साधारणपणे झालेली वाढ रक्कम रुपये ------------------

१६. लाभधारकांनी दुग्धव्यवसायासाठी गाय/ म्हैस घेतली असेल तर

१. गाय/ म्हैस यांचेपासून दररोज मिळणारे दुध लिटर -----------

२. गाय/म्हैस सांभाळण्यासाठी दररोज येणारा साधारण खर्च रुपये ----
(खाद्य कडबा/गवत/खावटी इ. )

३. गाय/म्हैस यांच्यापासून मिळणा-या दुधाचे दररोजचे उत्पन्न रुपये
घरी वापरलेले दुध लिटर-------
विक्रि करावयाचे दुध लिटर ----------------------)

४. लाभधारकाकडे जमीन आहे का? होय नाही
होय असल्यास बागायत हे.------------ जिरायत हे.------------

५. दुध विक्रिसाठी दुध संकलन
केंद्र गांवात / पाडयात आहे का ? होय नाही
नाही असल्यास दुध विक्रिसाठी उपलब्ध असलेली बाजारपेठ/ दुध -संकलन केंद्राचे अंतर
------------- बजार पेठ अंतर -----------
दुध विक्रिचा दर प्रति लि. रुपये

६. गाय/ म्हैस यासाठी लाणारा चारा शेतात तयार होतो का ?

| होय | नाही |
|---|---|

१७. शेती उत्पन्नासाठी कर्ज अनुदान घेतले असल्यास त्या बाबीचे नांव -------------

-------------------------------------------------------------------------------

मंजूर कर्ज रु.-------------------- अनुदान रु.----------------

योजनेचे कर्ज व अनुदान मिळाल्यामुळे शेतीचे उत्पन्न वाढले का ?

| होय | नाही |
|---|---|

होय असल्यास वाढीव उत्पन्न रक्कम रुपये ---------

योजने पुर्वीचे वार्षिक उत्पन्न रु.---------------------

सध्याचे वार्षिक उत्पन्न रु.-------------------

१८. कुटुंबाकडे असलेले पशुधन

| अ.क्र. | पशुधन | दुभती | भाकड | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | गायी | | | |
| २. | म्हशी | | | |
| ३. | शेळया/ मेंढया | | | |
| ४. | बैल | | | |
| ५. | कोंबडया | | | |
| ६. | इतर | | | |

योजनेत दुभती जनावरे मिळाली असल्यास

| | | |
|---|---|---|
| १. | गाय | संख्या |
| २. | म्हशी | संख्या |
| ३. | शेळया/मेंढया | संख्या |
| ४. | बैल | संख्या |
| ५. | कोंबडया | संख्या |

१९. योजने अंतर्गत मिळालेली मालमत्ता आहे का ? होय नाही

(योग्य त्या बाबीस ✔ अशी खुण करावी )

नाही असल्यास मालमत्ता नसण्याची कारणे

१. मालमत्ता विकली

२. मालमत्ता चोरीस गेली

३. इतर

२०. व्यवसायासाठी मिळालेला कर्ज पुरवठा पुरेसा आहे का ? होय नाही

२१. कर्ज परत फेडीचा हप्ता रक्कम रु.------------------------------

| | | |
|---|---|---|
| कर्ज परत फेड मासिक / तिमाही आहे का ? ------------------------ | मासिक | तिमाही |
| कर्ज परत फेड नियमित केली जाते का ? | होय | नाही |
| कर्ज मिळण्यास अडचण आली का | होय | नाही |

होय असल्यास अडचणीचे स्वरुप

| |
|---|
| १ |
| २. |
| ३. |
| ४. |

कुटुंबातील सदस्यांना नोकरी मिळविण्यासाठी प्रयत्न केला जात आहे का ?

| | |
|---|---|
| होय | नाही |

होय असल्यास नोकरीसाठी प्रयत्न करणा-या सदस्याची शैक्षणिक पात्रता

| | |
|---|---|
| बी.ए.<br>एम.ए.<br>बी.एस.सी.<br>एम.एस.सी<br>इतर | |

यापुर्वी व्यवसायासाठी कर्ज घेतले आहे का ?

| | |
|---|---|
| सावकारा-कडून | बॅंकेक-डून |

खाजगी सावकाराकडून घेतले असल्यास व्याजाचा दर (दरमहा)

| |
|---|
| रुपये |

कर्जाकरीता सावकारास गहाण म्हणून काही मालमत्ता ठेवली आहे का ?

| | |
|---|---|
| होय | नाही |

२२. कुटुंबास वर्षभर पुरेसे अन्नधान्य उपलब्ध होते का ?

| | |
|---|---|
| होय | नाही |

नसल्यास त्याची कारणे (योग्य त्या बाबींस ✔ अशी खुण करावी )

१. रोजगारा अभावी

२. स्वस्तधान्य दुकानातून धान्य नियमित मिळत नसल्यामुळे

३. धंदा / व्यवसाय व्यवस्थीत चालत नसल्यामुळे

४. इतर

आहारात घ्यावयाच्या पदार्थांचा वापर

(योग्य त्या बाबीस ✔ अशी खुण करावी )

१. पालेभाज्या २. फळभाज्या ३. दुध ४. अंडी ५. मांस ६. मासे ७.कडधान्य

२३. कुटुंबास शिक्षणासाठी कर्जाची गरज आहे का ?

| | |
|---|---|
| होय | नाही |

२४. आरोग्यसाठी दवाखान्याची सोय गावांत उपलब्ध आहे का ?

| | |
|---|---|
| होय | नाही |

नसल्यास सोय असलेल्या ठिकाणच्या गावाचे नांव -----------

अंतर कि.मी.---------

२५. कुटुंबातील बालकांचे कुपोषण झाले आहे का ?

| | |
|---|---|
| होय | नाही |

होय असल्यास संख्या घ्यावी मुले------------ मुली -------------

कुपोषण झालेले वर्ष २००५-०६

२००४-०५

२००३-०४

२००२-०३

| लाभार्थी कुटुंब अल्प भुधारक / अति अल्पभुधारक आहे का ? | अल्पभुधारक | अति अल्प - भुधारक |
|---|---|---|

शेतीला उपलब्ध सिंचन सुविधा (योग्य त्या बाबीस ✔ अशी खुण करावी ).

१. विहिर २. नदी ३. तलाव ४. ओढा / नाला ५. इतर

| व्यवसाय वाढविण्यासाठी जादा कर्जाची गरज आहे का ? | होय | नाही |
|---|---|---|

होय असल्यास रक्कम रुपये ----------------------------

| शेतीच्या विकासासाठी कर्जाची आवश्यकता आहे काय ? | होय | नाही |
|---|---|---|

होय असल्यास कोणत्या बाबीसाठी

बाबीचे नांव -------------------------------

रक्कम रुपये ---------------------------------

योजनेबाबत लाभार्थ्याचे अभिप्राय

---------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------

ठिकाण :-

दिनांक :-

प्रगणकाची स्वाक्षरी
नांव/ हुद्दा

---**---

कोंबडयांची संख्या पहाता त्यांचे प्रमाण घरटी सरासरी एकच पडते. आदिवासींची कोंबडया पाळून उपजिविका करण्याची प्रवृत्तीच दिसून येत नाही. हया प्रवृत्तीत वाढ करण्यासाठी ईच्छूक लाभार्थींना कोंबडयांचे वाटप त्यांच्या आर्थिक सहभागासहित करणे योग्य वाटते.

थोडक्यात आदिवासींकडील पशुधनाची संख्या नगण्य आहे. त्यामुळे दुध दुभते, अंडी, मटण हया जीवनावश्यक वस्तुच्या बाबींची उपलब्धता त्याच्या जीवनात असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे कुपोषणासारख्या घटनाना आदिवासींना वारंवार सामोरे जावे लागते. योजनेमुळे ८० % कुटूंबांना म्हशी मिळाल्याने त्यांच्या घरात दुध वापरण्याच्या प्रमाणात निश्चितच वाढ झाली आहे. घरचेच दूध दुभते असल्यानंतर स्वाभाविकपणे दुध घरात वापरले जाते. दुग्ध व्यवसायाच्या १२९ लाभार्थ्यांपैकी १०० लाभार्थी घरामध्यें १ / २ लिटर दूध वापरतात.

दुधाची उपलब्धता मुलांच्या कुपोषणाच्या आलेखाच्या चढत्या कलास रोखेल व ही फार महत्वाची बाब योजना देण्यातुन साधली जात आहे हे निश्चित.

---**---

## ब) योजनेतून मिळालेल्या लाभाची स्थिती

पहाणीमधील लाभार्थ्यांची योजनेंतर्गत मिळालेली बहुतांश मालमत्ता सुस्थितीत असून किराणा दुकान , पशुखाद्य, खतविक्री, व थ्रेशर गिरण हे व्यवसाय व्यवस्थित चालु असल्याचे आढळले. थ्रेशर गिरण उत्तम स्थितीत चालू असून किराणा मालाच्या दुकानातही मिळालेल्या कर्जाच्या मानाने माल भरलेला आहे. दुग्ध व्यवसायासाठी कर्ज घेतलेल्या २ ते ३ लाभार्थ्यांच्या म्हशी मेल्या असून त्यांना त्याबदली पशुधन विमा योजनेमुळे पुन्हा म्हशी देण्यात आलेल्या आहेत. वाटप केलेल्या शेळी गटापैकी काही थोडया शेळया मरण पावलेल्या असल्यातरी हयात असलेल्या शेळया चांगल्या स्थितीत आहेत.

## क) कर्जासाठी योजनेची निवड


कर्ज घेण्यासाठी व्यवसाय निवडतांना दुग्ध व्यवसायाची निवड करणा-या लाभार्थ्यांच्या जमिन धारणेकडे दृष्टीक्षेप टाकला असता दुग्ध व्यवसायाच्या १२९ लाभार्थ्यांपैकी ३४ लाभार्थी भूधारक असून. हे प्रमाण जवळपास २६% आहे. धुळे जिल्हयातील शिरपूर तालुक्यात जमिन धारणेचे प्रमाण १४ % इतके अत्यल्प असतांना एकूण २८ लाभार्थ्यांपैकी २० म्हणजे ७१ % लाभार्थ्यांनी दुग्धव्यवसायासाठी कर्ज घेतले आहे.

यावरुन असे दिसते की लाभार्थी, योजना घेतांना वैयक्तिक स्थितीचा व सभोवताली उपलब्ध असणा-या साधन सामग्री व इतर बाबींचा फारसा विचार करीत नाहीत. आजुबाजुच्या चार जणांनी घेतली म्हणून लाभार्थी योजना स्विकारतात.भाजी व फळे विकणा-या महिला लाभार्थी वगळता इतर सर्व योजनांबाबत बहुतांशी लाभार्थ्यांची हिच स्थिती आहे.

शेळीपालन व्यवसायासाठी कर्ज घेतलेल्या नंदूरबार जिल्हयातील शहादा तालूक्यातील ६ लाभार्थ्यांनी शेळीपालन व्यवसायात नविन शेळयांची पैदास होई पर्यंतच्या अवधित योजनेचा काहीच फायदा मिळत नसल्याची तक्रार केली. असे असले तरी ब-याच लाभार्थ्यांना ही योजना किफायतशिर वाटली असल्याचे दिसून आले.

---**---

# जमातनिहाय वर्गीकरण



## २) जमात निहाय वैशिष्ठये

**वरा :-**

नंदूरबार जिल्हयातील १२४ कुटूंबातील ५ कुटुंबे पावरा जमातीची असून सर्वच्या सर्व पावरा नातीच्या महीला लाभार्थी निरक्षर आहेत ५ पैकी ४ म्हणजे ८०% कुटुंबाकडे अत्यल्प जमिन आहे. र्व कुटूंबांनी शेळीवाटप योजनेचा लाभ घेतला असून त्यांचा मुख्य व्यवसाय शेतमजुरी आहे व ंचेकडे पशूधनही नाही.

धुळे जिल्हयात पावरा जमातीचे ८ लाभार्थी आहेत पैकी ५०% लाभार्थी साक्षर असून सर्वच भार्थी भूमीहीन आहेत.

**कणी :-** नंदूरबार जिल्हयात कोकणी लाभार्थी नाहीत . मात्र धुळे जिल्हयातील ४१ लाभार्थ्यांपैकी लाभार्थी कोकणी आहेत. हे प्रमाण जवळपास ६०% आहे. २५ पैकी १४ लाभार्थी साक्षर हेत. व १० म्हणजे ४०% लाभार्थी भूधारक आहेत., कोकणी जमातीचे साक्षरतेचे व भूधारणेचे ण अनुक्रमे ५६% ते ४०% च्या आसपास आहे.

**नका :-**

नंदूरबार जिल्हयातील १२४ लाभार्थ्यांपैकी धनका जमातीचे ५ लाभार्थी असून हे सर्व लाभार्थी हीन व निरक्षर आहेत. सर्वांनी महिष पालन योजनेचा लाभ घेतला आहे. व ३ लाभार्थ्यांचा मुख्य साय मजुरी असून एक लाभार्थी शेतमजुरी करत असून एक इतर व्यवसाय करत आहे.

धुळे जिल्हयातून धनका जमातीचे लाभार्थी निवडलेले नाहीत.

**चि :-**

नंदूरबार जिल्हयात मावची जमातीचा एक लाभार्थी असून तो निरक्षर आहे. शेतमजुरी हाच या मुख्य व्यवसाय आहे. सदर मावची लाभार्थी भुमिहीन आहे.

धुळे जिल्हयातील शिरपूर तालुक्यातील २८ लाभार्थ्यांत मावची जमातीचा एकही लाभार्थी . तर साक्री मध्ये १३ लाभार्थ्यात ३ मावची आहेत व ते सर्व निरक्षर व भूमिहीन आहेत.

मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे -